**प्रेस नोट** **दि.०९/०३/२०१९**

## लष्कर पोलीस स्टेशन

## अल्पवयीन मुलास त्यांचे वडीलांचे ताब्यात दिले

दिनांक ०८/०३/२०१९ रोजी १८:३० वा च्या दरम्यान नाझ चौकात एक संशयीत मुलगा फिरत असल्याचे नाझ चौकात फिक्स पॉईटला असणारे सी आर मोबाईलवरील अंमलदार पो शि ८१४९/ भोसले व पोशि २३५२/दोरगे यांच्या निर्दशनास आल्याने त्यांनी त्या मुलास ताब्यात घेवून त्याचेकडे चौकशी केली असता एक अल्पवयीन मुलगा वय १४ वर्ष रा. मस्जिद गल्ली, बर्माशेल, विमानतळ रोड, पुणे असे असल्याचे सांगून तो घरी कोणालाही काहीएक न सांगता बॅग घेवून आल्याचे सांगीतले. तेव्हा त्याच्याकडून त्याचे वडीलांचे मोबाईल वर संपर्क साधून सदर मुलाबाबत विचारले असता तो त्यांचाच मुलगा असून त्यास मी येईपर्यंत सोडू नका असे बोलल्याने सी आर मोबाईलवरील अंमलदार हे त्या मुलास पोलीस ठाणेस घेवून आले व वरिष्ठांना सदर बाबत हकिकत सांगून त्यास ठाणे अंमलदार यांच्या ताब्यात दिले. नमुद मुलाच्या वडीलांना लवकरात लवकर लष्कर पोलीस स्टेशन येथे येण्यास सांगितले. त्यानंतर सुमारे २१:०० वाजता वर नमूद मुलाचे वडील नामे ईस्माईल शेख हे पोलीस ठाणेस आले त्यानंतर त्यांची खाञी करुन चंद्रकांत द. भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लष्कर पोलीस स्टेशन पुणे यांचे आदेशान्वये त्यास वडीलांचे ताब्यात देण्यात आले आहे.

